# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.**

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

**Website**: www.jdroamt.org
**Fax No**: (0721) 2577913


क्रमांक :- विकाअ/शिक्षण /पदविका प्रवेश/२०२१/ 845
दिनांक :- 08-07-2021

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रम चालविणा-या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेकरीता आवश्यक असलेली कागदपत्रे/प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणेबाबत.**

**संदर्भ :-** मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १०/एडीएम/प्रमाणपत्र/२०२१/५११ दिनांक ६ जुलै २०२१.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्यामार्फत इयत्ता १० वी नंतरच्या प्रथम वर्ष अभिांत्रिकी पदवीका तसेच इयत्ता १२ नंतरच्या प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी, आणि सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी तसेच थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील सदर प्रवेश प्रक्रियेकरीता ऑनलाईन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया दिनांक ३०/६/२०२१ ते २३/०७/२०२१ पर्यंत राबविण्यात येत आहे. परंतु विद्यार्थ्यांना सदर प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे (अधिवास प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र व उत्पन्नाचे प्रमाणपत्र) अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नसल्यामुळे विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास अडचणी निर्माण होत आहे.

सदर अडचणीचे निराकरण करण्याचे दृष्टीने मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांनी सदर कागदपत्रे लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याबाबत मा.उपविभागीय अधिकारी/तहसिलदार व महाराष्ट्र राज्यातील सर्व महसूल उपविभागीय कार्यालये तसेच तालुका स्तरीय कार्यालयास संदर्भिय पत्रान्वये विनंती केलेली आहे (सुलभ संदर्भासाठी संदर्भिय पत्राची प्रत जोडलेली आहे).

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमधील नियुक्त केलेले नोडल अधिकारी (Nodel Officer) यांना सदर पत्र आपल्या जिल्हयामध्ये येत असलेल्या मा.उपविभागीय अधिकारी/तहसिलदार यांच्या निदर्शन आणुन देऊन विद्यार्थ्यांना सदरीच प्रमाणपत्रे लवकर उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करण्यात यावी.

तसेच आपणास कळविण्यात येते की, सदरचे पत्र वरील नमुद प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या तालुकास्तरावरील अधिकाऱ्यांचे निदर्शनास येईल  याबाबत दक्षता घ्यावी. संबंधित विभागाचे कार्यालय जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर असल्याने कामाचा व्याप लक्षात घेता नोडल अधिकारी यांना मदतनिस म्हणून अधिव्याख्यांताची नियुक्ती करावी तसेच याबाबत नियमित पाठपुरावा करण्यात यावा.

**सहपत्र : वरीलप्रमाणे**

**(डॉ. आर.पी. मोगरे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.